# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांचे "अपार आयडी" देण्याबाबत

**(१) ४१३ (२४-०४-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या निर्देशानुसार "वन नेशन वन स्टुडंट आयडी" या मोहिमेअंतर्गत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे – ॲटोमेटेड परमनंट ॲकेडमीक अकाऊंट, रजिस्ट्री आयडी" म्हणजे "अपार आयडी" काढण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, "वन नेशन वन स्टुडंट आयडी" या मोहिमेंतर्गत सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांचे "अपार आयडी" काढण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२४-१०-२०२५) :** (१) होय.

(२) राज्यातील ८२.७५ टक्के विद्यार्थ्यांचे "अपार आयडी" काढण्याची प्रक्रीया पूर्ण झाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात शासकीय क्रीडा स्पर्धा तसेच विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत जखमी खेळाडूस शासनाकडून औषधोपचाराचा खर्च मिळण्याबाबत

**(२) ४६८ (२४-०४-२०२५) श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले : तारांकित प्रश्न क्रमांक १९२१३ ला दिनांक २० जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय क्रीडा स्पर्धा तसेच विद्यापीठ क्रीडा स्पर्धा सुरू असताना एखाद्या खेळाडू जखमी झाल्यास त्याचा औषधोपचाराचा सर्व खर्च शासनाकडून करण्याबाबत खेळाडूंकडून विभागाकडे वारंवार मागणी होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय स्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्या खेळाडूंचा विमा शासनाने व विद्यापीठ स्पर्धांतील

खेळाडूंचा विमा विद्यापीठाने उतरविणे याबाबतचे संघटनेचे निवेदन प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय क्रीडा स्पर्धा तसेच विद्यापीठ क्रीडा स्पर्धेमध्ये जखमी झालेल्या खेळाडूंचा औषधोपचाराचा सर्व खर्च मोफत करण्याबाबत व खेळाडूंचा विमा शासनाने व विद्यापीठ स्पर्धांतील खेळाडूंचा विमा विद्यापीठाने उतरविणे याबाबतचे प्राप्त झालेल्या संघटनेचे निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०६-११-२०२५) :** (१) होय.
(२) व (३) दिनांक २१ जून २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह योजनेंतर्गत सर्व विद्यार्थांना कोणत्याही कारणाने जखमी झाल्यास सानुग्रह अनुदान अनुज्ञेय आहे. सदरची योजना इयत्ता १ली ते १२ वी पर्यंत शिकणाऱ्या सर्व मुला-मुलींना लागू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी अनुदानित संस्थांमधून सेवानिवृत्त होणाऱ्या ग्रंथपालांना अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ मिळण्याबाबत

**(३) ५४८ (२४-०४-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेवानिवृत्त होणाऱ्या ग्रंथपालांना अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ देय असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रंथपालांना अर्जित रजा रोखीकरण लाभ अमरावती व इतर विभागात देण्यात येत असून नागपूर विभागातील ग्रंथपालांना अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाजगी अनुदानित संस्थांमधून सेवानिवृत्त होणाऱ्या ग्रंथपालांना अर्जित रजा रोखीकरण लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१२-११-२०२५) :** (१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक १४/११/१९९५ रोजीच्या शासन निर्णयानुसार ग्रंथपाल संवर्गात अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ देय आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंठा (जि.जालना) येथील क्रिडा संकुलाचे काम निधीअभावी अपूर्ण असल्याबाबत

**(४) ७०७ (२४-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंठा (जि.जालना) येथील क्रीडा संकुलाचे काम निधीअभावी अपूर्ण असल्याने खुले मैदान दगड व काटया झुडपांनी व्यापले असल्याने खेळाडूंची गैरसोय होत असून याकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मंठा येथील क्रिडा संकुलासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (१६-१०-२०२५) :** (१) व (२) मंठा तालुका क्रीडा संकुलासाठी एकूण रुपये १६३०.०० लक्ष किंमतीचे अंदाजपत्रकास शासन अनुदान मर्यादे व्यतिरिक्त उर्वरित निधी हा क्रीडा संकुल समितीने स्वबळावर उभारण्याच्या अधीन राहून या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आलेली आहे. आतापर्यंत रुपये ४००.०० लक्ष निधी सदर क्रीडा संकुलास वितरित करण्यात आला असून क्रीडा संकुलाची कामे प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडी तालुक्यातील पडघा केंद्रातील जिल्हा परिषद मराठी शाळा (आनंद नगर, बोरीवली) ही मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(५) १०३५ (२४-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आनंद नगर, बोरीवली (पडघा, ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील जिल्हा परिषद मराठी शाळा ही मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळेत वीजपुरवठा आणि पाणीपुरवठा यासारख्या मूलभूत सोयीसुविधांचा अभाव असल्यामुळे विद्यार्थांना अत्यंत त्रासदायक परिस्थितीमध्ये शिक्षण घ्यावे लागत असून या समस्यांबाबत वारंवार तक्रार करूनही बोरीवली ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत असल्यामुळे पालक आणि ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भिवंडी तालुक्यातील पडघा केंद्रातील जिल्हा परिषद आदिवासी पाडा (आनंद नगर, बोरीवली) येथील मराठी शाळेला मूलभूत सुविधां पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-१०-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य वक्फ मंडळाकडे असणाऱ्या जमिनी आणि मालमत्तांचे भू-सर्वेक्षण (जिओ मॅपिंग) करणार असल्याबबत

**(६) १६०९ (२४-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य वक्फ मंडळाकडे असणाऱ्या जमिनी आणि मालमत्तांचे भू -सर्वेक्षण (जिओ मॅपिंग) करण्याचा निर्णय राज्याच्या अल्पसंख्यांक विकास मंत्रालयाने माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या वक्फच्या २३,५६६ मालमत्ता नोंदणीकृत आहेत आणि त्याचे एकूण क्षेत्र ३७,३३० हेक्टर इतके असून अल्पसंख्यांक विभागाच्या अंदाजानुसार,वक्फ मालमत्ता संख्या जवळपास २७,००० असून त्यांचे क्षेत्र ४०४६८ हेक्टर इतके आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू आकडेवारीतील तफावत दूर करण्यासाठी आणि मालमत्तेची अचूक नोंदणी करण्यासाठी भू -सर्वेक्षण (जिओ मॅपिंग) करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मालमत्तेची अचूक नोंदणी करण्यासाठी शासनाने केलेल्या कार्यवाहीची सद्य: स्थिती काय आहे ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०६-११-२०२५) :** (१) होय हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे जवळपास १८००० वक्फ संस्था नोंदणीकृत असून त्यांची मालमत्ता सुमारे ५०,००० हेक्टर इतकी आहे. GIS Mapping नंतर वक्फ मालमत्तेची अचूक आकडेवारी प्राप्त होणार आहे.
(३) होय हे खरे आहे. वक्फ मालमत्तांच्या अभिलेख्यामध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी तसेच वक्फ मालमत्तांचे कायमस्वरुपी जतन व नोंदी करण्यासाठी राज्यातील सर्व वक्फ मालमत्तांचे GIS Mapping करण्याचा शासन निर्णय घेतला आहे.
(४) सद्य:स्थितीस वक्फ मालमत्तांचे GIS Mapping करण्याचे काम सुरु आहे.

---

## राज्यातील सर्व खाजगी शैक्षणिक संस्थांमधील शिक्षण शुल्क दर निश्चित करण्याबाबत

**(७) १७३० (२४-०४-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २३१२० ला दिनांक ५ जुलै, २०२४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सर्व शिक्षा अभियानांतर्गत सर्व स्तरातील वंचित घटकांना प्राथमिक तसेच माध्यमिक शिक्षणाचा लाभ व्हावा याकरीता सर्वत्र खाजगी शैक्षणिक संस्थाना मान्यता देण्यात येते परंतु वाढीव खर्चामुळे दरवर्षी अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वच नामांकित खाजगी संस्था मनमानी कारभार करुन जास्तीचे शैक्षणिक शुल्क आकारत असून त्यावर शासनाचे कोणतेच अंकुश नसल्याने मध्यमवर्गीयांतील पाल्यांना उच्च दर्जाच्या शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्व खाजगी संस्थांना शैक्षणिक शुल्काबाबत राज्यस्तरावर एकच शुल्क आकारणी बंधनकारक करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, राज्यस्तरीय शैक्षणिक शुल्क कृती समिती तयार करुन त्यासंदर्भातील नियमावली तयार करुन सर्वांना माफक दरात शिक्षण उपलब्ध व्हावे याकरीता कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा

करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१४-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) हे खरे नाही.

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ मधील कलम ६ अन्वये शाळा व्यवस्थापन विद्याविषयक वर्षाच्या प्रारंभाच्या किमान ६ महिने आधी कार्यकारी समितीकडे प्रस्तावित शुल्क मान्यतेसाठी सादर करण्यात येते. कार्यकारी समितीस ३० दिवसाच्या कालावधीत शुल्काच्या प्रस्तावास मान्यता देण्याचे अधिकार आहेत. मान्यता देताना कार्यकारी समिती नव्याने शुल्काची रक्कम निश्चित करू शकते. कार्यकारी समितीने मान्यता दिलेले शुल्क दोन विद्याविषयक वर्षासाठी बंधनकारक होते.

कार्यकारी समितीने ३० दिवसांच्या कालावधीत शुल्काच्या प्रस्तावास मान्यता न दिल्यास सदर बाब विभागीय शुल्क नियामक समितीच्या विचारार्थ सादर करण्याची व्यवस्थापनास मुभा आहे. विभागीय शुल्क नियामक समितीचा निर्णय अंतिम होईपर्यंत शाळा व्यवस्थापनाला मागील विद्याविषयक वर्षाचे शुल्क अधिक पंधरा टक्के एवढे शुल्क आकारण्याची मुभा आहे.

व्यवस्थापनाकडून ठरविण्यात आलेले शुल्क व कार्यकारी समितीने मान्यता दिलेले शुल्क या मध्ये १५ टक्क्यांपेक्षा अधीक तफावत असेल तर व्यवस्थापनास ३० दिवसाच्या कालावधीत विभागीय शुल्क नियामक समितीकडे अपिल करता येईल. विभागीय शुल्क नियामक समितीच्या निर्णयाविरुध्द व्यवस्थापन किंवा कार्यकारी समितीस कलम ११ नुसार घटीत पुनरीक्षण समितीकडे अपील करता येईल, अशा तरतुदी आहेत. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ तसेच महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) नियम, २०१६ मध्ये सुधारणा करण्याची बाब विचाराधिन आहे.

---

## राज्यात वीज कोसळण्याची पूर्वसूचना देण्यारी संयंत्रे बसविण्याबाबत

**(८) १८६१ (१७-०४-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्रतिवर्षी माहे एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत वीज कोसळून अनेक शेतकऱ्यांचे मृत्यू होत असून राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या सन २०२३ च्या आकडेवारीनुसार २६९ जणांचा मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज कोसळून शेतकऱ्यांचे होणारे मृत्यू रोखण्याकरीता परदेशात वापरण्यात येणाऱ्या अवघ्या १० लाख किंमतीच्या यंत्रामुळे सुमारे २५० किलोमीटर क्षेत्रफळात ४५ मिनिट अगोदर वीज कोसळण्याची पूर्वसूचना देण्यात येत असल्याने ही यंत्रे राज्यात आवश्यक त्या ठिकाणी बसविल्यास वीज कोसळून नाहक होणारे मृत्यू टाळता येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू यंत्रणा खरेदी करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे तथापि, त्यामध्ये दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर यंत्रणा तातडीने कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१०-०९-२०२५) :** (१) राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या सन २०२२ च्या प्रकाशित आकडेवारीनुसार २३६ मृत्यूची नोंद आहे. सन २०२३ ची अधिकृत आकडेवारी अद्याप उपलब्ध झालेली नाही. तथापि, सन २०२३ मध्ये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून उपलब्ध माहितीनुसार १८१ इतकी मनुष्यहानी झाल्याची नोंद आहे.

(२), (३) व (४) वीज कोसळून होणारे मृत्यू टाळण्यासाठी आय.आय.टी.एम. पुणे या राष्ट्रीय शिखर संस्थेने या संदर्भात विकसित केलेले दामिनी ॲप्लिकेशन आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण मार्फत सचेत प्रणाली यांचा वापर करुन ४० कि.मी.च्या परिघामध्ये कोसळणाऱ्या संभाव्य वीजेबाबतची पूर्वसूचना नागरिकांना एसएमएस (SMS) व नोटिफिकेशन माध्यमातून जवळपास अर्धा तास अगोदर दिली जाते. तसेच विभागाद्वारे नागरिकांनी वीज कोसळण्याच्या वेळी घ्यावयाची खबरदारी याविषयी विविध माध्यमांतून वेळोवेळी जनजागृती करण्यात येत आहे.

परदेशात वापरण्यात येणाऱ्या या संदर्भातील यंत्रणांच्या धर्तीवर दामिनी व सचेत सारखी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. तथापि, परदेशात वापरली जाणारी यंत्रणा देशात प्रचलित झाल्यावर अशी यंत्रणा उपलब्ध झाल्यास त्याचा उपयोग करणेबाबत योग्य निर्णय घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात क्रीडा शिक्षकांची भरती करण्याबाबत

**(९) २३९१ (१८-०७-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या १३ वर्षांपासून क्रीडा शिक्षकांची भरती न झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही, तसेच त्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासावर नकारात्मक परिणाम होत असून शारीरिक शिक्षणाचे महत्त्व कमी होत असून क्रिडा शिक्षकांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांमधील क्रीडा गुणांना वाव मिळत नसून त्यांच्या सर्वांगीण विकासात चालना मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक शाळांमध्ये क्रीडा शिक्षकच नसल्यामुळे क्रीडा तासांना इतर विषय शिकवले जातात किंवा ते तास रद्द केले जातात. यामुळे शारीरिक शिक्षणाला दुय्यम स्थान मिळत आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये खेळाबद्दल अनास्था निर्माण होण्याची शक्यता वाढत आहे. खेळांची आवड आणि शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व यातून कमी होत आहे. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्रीडा शिक्षकांची भरती न होण्याची कारणे काय आहेत तसेच क्रीडा शिक्षकांची भरती करण्याबाबत आणि शारीरिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्याबाबत शासनाने कोणत्या कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (२७-१०-२०२५) :** (१) सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

(२) अशा आशयाची निवेदने मा.लोकप्रतिनिधींकडून व काही शिक्षक संघटनांकडून शासनास प्राप्त होत

असतात.
(३) प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने निर्णय घेणे शक्य नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्व शाळा आणि अंगणवाड्यांचे मॅपिंग करीता मोबाईल ॲपची निर्मिती करण्यात येत असल्याबाबत

**(१०) २४६१ (१८-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व शाळा आणि अंगणवाड्यांचे मॅपिंग करण्यात येणार असून याकरीता शासनाने नव्या मोबाईल अप निर्मिती करणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ॲपअंतर्गत विविध विभागांमार्फत कार्यरत असणाऱ्या सर्व शाळा आणि अंगणवाड्यांसाठी विशेष डॅशबोर्ड तयार केले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ॲपचा उपयोग कोणत्या कामांकरीता होणार आहे तसेच ॲप निर्मितीबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, तसेच हे ॲप केव्हापर्यंत कार्यरत होणार आहे ?

**श्री.दादाजी भुसे (१३-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) राज्यातील एकूण १,०८,१६५ शाळांपैकी १,०२,९४३ (९५.१७%) शाळांचे मॅपिंग पूर्ण झालेले आहे. उर्वरित शाळांचे मॅपिंग करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## राज्यातील कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत

**(११) २५९९ (१८-०७-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अभियांत्रिकी, एमबीए, एमसीए, फॉर्मसी, तंत्रनिकेतन इ. व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविले जाणारे कायम विनाअनुदानित तत्वावरील महाविद्यालये कार्यरत असल्याचे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यात हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी काम करत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, व्यावसायिक अभ्यासक्रमांचे महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनाकडून वेतन मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१५-१०-२०२५) :** (१), (२) व (३) राज्यात १९८३ पासून खाजगी /तांत्रिक महाविद्यालये व तंत्रनिकेतने कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्याचे धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार राज्यात तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्यास कायम विनाअनुदानित तत्वावर शासन मान्यता देण्यात येते. संस्थांना मान्यता देताना संस्थेत नियुक्त करावयाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या व्यवस्थापनाची आणि आर्थिक दायित्वाची जबाबदारी संबंधित संस्थेच्या व्यवस्थापनाची असते. त्यामुळे कायम विनाअनुदानित तत्वावरील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनाकडून वेतन देण्याबाबत प्रश्न लागू होत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शाळांनाही “स्कॉफ” मानांकन मिळविणे बंधनकारक झाल्याबाबत

**(१२) २६९९ (१८-०७-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नवीन शैक्षणिक धोरणानुसार शाळांमधील संसाधने व शिक्षणाचा दर्जा यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शिक्षण विभागाने शाळा मुल्यांकन प्रक्रिया सुरु केली असून महाविद्यालयांना मिळणाऱ्या “नॅक” (NAAC) प्रमाणेच, शाळांनाही “स्कॉफ” (SCOF) मानांकन (शाळा गुणवत्ता आणि मूल्यांकन फ्रेमवर्क) मानांकन मिळविणे बंधनकारक झाले आहे त्यासाठी एससीईआरटीच्या पोर्टलवर प्रत्येक शाळेला स्वमूल्यांकन करुन घ्यायचे आहे मात्र हे मूल्यांकन करण्यात अर्ध्याहून अधिक शाळांनी दुर्लक्ष केले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मुल्यांकनाची मुदत संपल्यावरही १ लाख ८ हजार शाळांपैकी अद्यापही १,२४९ शाळांनी या प्रक्रियेत अद्याप सहभाग घेतला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुदत संपल्यानंतरही उर्वरित शाळांनी मुल्यांकन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०६-११-२०२५) :** (१) हे खरे नाही. दिनांक १५ मे २०२५ अखेर राज्यातील एकूण १,०८,५३० शाळांपैकी १,०१,५१० एवढ्या शाळांनी (९३.५३%) स्वयं-मूल्यांकन पूर्ण केले होते.
(२) स्वयं-मूल्यांकन करण्याकरीता राज्यातील सर्व - शाळांना दिनांक ३०/०६/२०२५ ही अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली होती. दिनांक ३०/०६/२०२५ अखेर राज्यातील एकूण १,०८,५३० शाळांपैकी १,०२,६७५ एवढ्या शाळांनी (९४.६०%) स्वयंमूल्यांकन पूर्ण केले आहे. तसेच उर्वरित ४७६० या शाळांनी (४.३६%) स्वयं-मूल्यांकनात नोंदणी पूर्ण केले असून माहिती भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तर नोंदणी न केलेल्या शाळांची संख्या ११२५ (१.०४%) आहे.
(३) स्वयं-मूल्यांकन करण्याकरीता नोंदणी न केलेल्या शाळांच्याकडून “नोंदणी न केल्यावावतचा खुलासा” व माहिती अपूर्ण नोंदविलेल्या शाळांच्याकडून “माहिती अपूर्ण नोंदविलेबाबतचा खुलासा सादर

करण्याविषयी आयुक्त (शिक्षण) यांच्या स्तरावरुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक) यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शालेय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पुर्वलक्षी प्रभावाने सुधारित आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबत

**(१३) २७२३ (१८-०७-२०२५) श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शालेय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वरिष्ठ महाविद्यालयीन व कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे दिनांक १ ऑक्टोबर,२००६ ची १०,२०,३० वर्षाची आश्वासित प्रगत योजना लागू करण्यासंदर्भातील तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री यांनी आश्वासन दिले असून १०, २०, ३० वर्षाची सुधारित आश्वासित प्रगती योजना पूर्वलक्ष प्रभावाने लागू करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आपल्या विभागाकडे वारंवार मागणी करत असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकाच वेतनश्रेणील सेवेची १२ वर्षे पूर्ण झालेल्या शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी आणि २४ वर्षे पूर्ण झालेल्या शिक्षकांना निवड वेतनश्रेणी लागू करण्यात येते, मात्र शासनाने एकूण पात्र शिक्षकांपैकी फक्त २०% शिक्षकांनाच निवडश्रेणी देण्याची अट ठेवल्याने उर्वरित ८०% शिक्षकांवर अन्याय होणार असल्याने निवड श्रेणीसाठी आवश्यक इतर सर्व निकष पूर्ण करून फक्त २० टक्क्यांनाच निकषाची लावण्यात आलेली अट अन्यायकारक असल्याने असंख्य शिक्षक निवड श्रेणीपासून वंचित राहणार असल्याने सदर अट रद्द करून सरसकट सर्व शिक्षकांना विनाअट निवड वेतनश्रेणी लागू करण्याबाबत तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी,२०२४ ऐवजी दिनांक १ ऑक्टोबर,२००६ पासून आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यातील खाजगी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या मान्यताप्राप्त प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २ लााभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दिनांक १ ऑक्टोबर, २००६ पासून लागू करण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आलेली होती. तथापि, सदर योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहणार नाही तसेच कोणतीही थकबाकी देय होणार नाही असे अभिप्राय वित्त विभागाने दिलेले असून त्यास मा.मुख्यमंत्री यांनी मान्यता दिलेली आहे.तसेच, राज्यातील शिक्षकांना १०, २०, ३० वर्षांची आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबतची नस्ती वित्त विभागास सादर केली असता पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात आले आहेत. “केंद्र शासनाने प्राध्यापक डी.पी. चटोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या शिक्षकांसाठीच्या राष्ट्रीय आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार (चटोपाध्याय आयोगानुसार) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या तसेच खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना शासन निर्णय

दिनांक २ सप्टेंबर १९८९ अन्वये दिनांक १ जानेवारी १९८६ पासून केंद्र शासनाच्या धर्तीवर त्रिस्तरीय वेतनरचना विविध संवर्गात मूळ श्रेणी, वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी लागू करण्यात आली असून ती आजतागायत सुरू आहे. सेवा तीन कार्यासनाने दिलेल्या अभिप्राय पाहता व त्या अनुषंगाने विभागाने सादर केलेला खुलासा पाहता अद्याप केंद्रामध्ये शिक्षकांना अशा प्रकारची योजना लागू केल्याचे दिसून येत नाही त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या धोरणामध्ये राज्य शासनाने बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही"

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषदांच्या, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्राथमिक शाळांमधील विविध सुमारे १५ समित्यांचे एकत्रिकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबाबत

**(१४) ३१३३ (१८-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदांच्या, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्राथमिक शाळांमधील विविध सुमारे १५ समित्यांचे एकत्रिकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदांच्या, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्राथमिक शाळांमधील कोणकोणत्या समित्यांचे एकत्रिकरण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री.दादाजी भुसे (१०-११-२०२५) :** (१) होय.

(२) दिनांक १६ एप्रिल,२०२५ चे शासन निर्णयानुसार शासकीय,स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा स्तरावरील खालीलप्रमाणे नमूद रकाना क्र.३ मधील अनुक्रमे १ ते ६ समित्याचे अ.क्र.७ ते १२ समित्याचे अ.क्र.२ च्या विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समितीमध्ये एकत्रिकरण/ विलीकरण करण्याबाबत शासनाने निर्देश दिले आहे.

| अ.क्र | समितीची नाव | समाविष्ट/विलीन करावयाच्या समिती. |
|---|---|---|
| १ | शाळा व्यवस्थापन समिती | १)माता पालक संघ<br>२) शालेय पोषण आहार योजना समिती<br>३)पालक शिक्षक संघ<br>४)नवभारत साक्षरता समिती<br>५)तंबाखु संनियंत्रण समिती<br>६) SQAAF स्वंय मुल्यांकन समिती |
| २ | विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती | ७) विद्यार्थी सुरक्षा समिती<br>८) तक्रार पेटी समिती<br>९) शाळा बांधकाम समिती<br>१०) परिवहन समिती<br>११) शाळा व्यवस्थापन व विकास समिती<br>१२) शाळाबाह्य विद्यार्थ्यासाठी गावस्तर समिती |

अशाप्रकारे शाळास्तरावर यापुर्वी अस्तित्वात असलेल्या एकूण १५ समित्यांपैकी १२ समित्यांचे प्रत्येकी ६ अशा दोन समित्यांमध्ये एकत्रीकरण /विलीकरण होऊन उर्वरित २ सखी सावित्री व महिला तक्रार निवारण समिती/अंतर्गत तक्रार समिती अशा शाळास्तरावर एकूण ४ समित्या कार्यरत राहील.
(३) शासन निर्णय क्र.संकिर्ण ११२५/ प्र.क्र.२५१/२५/एसएम-१,दिनांक १६ एप्रिल,२०२५ निर्गमित झाल्याचे दिनांकापासून सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

---

## शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरण लागू करण्याबाबत

**(१५) ३६६७ (१८-०७-२०२५) श्री.संजय खोडके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ या दिवशी व त्यानंतर सेवेत आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वित्त विभागाच्या दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ च्या शासन निर्णयाप्रमाणे नवीन अंशदायी पेन्शन योजना तयार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेनुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना उपदान व रजा रोखीकरण लागू करण्यात आले नसल्यामुळे अध्यक्ष, राज्य शिक्षक संघ यांनी सचिव, शालेय शिक्षण विभाग व आयुक्त, शिक्षण महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ८ मे, २०२५ रोजी व त्यापुर्वी लेखी निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनचे उपदान व रजा रोखीकरणचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतलेला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०३-११-२०२५) :** (१) होय, वित्त विभागाच्या दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ च्या शासन निर्णयानुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना सुरु केली आहे.
(२) व (३) या अनुषंगाने वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा- ४, दिनांक ३१ मार्च, २०२३ द्वारे परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत योजनेच्या सभासदाचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना द्यावयाच्या कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्त उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने राज्यातील जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त खाजगी १००% अनुदानित प्राथमिक, माध्यमिक/उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती उपदान मंजूर करण्याबाबतचा शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्र. अंनियो-२०२३/प्र.क्र.२८/टिएनटी-६,दिनांक १४ जून २०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ पुरविण्याबाबतच्या पथदर्शी प्रकल्पाच्या कार्यपध्दतीबाबत

**(१६) ३७८८ (१८-०७-२०२५) श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ जर्मनीतील बाडेन-वुटेनबर्ग या राज्यास पुरविण्यासाठी दिनांक २५ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र राज्याने सामंजस्य करार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास दिनांक ११ जुलै, २०२४ रोजीच्या शालेय शिक्षण विभागाद्वारे या पथदर्शी प्रकल्पास मान्यता देण्यात आली असून पथदर्शी प्रकल्प सुरु झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या प्रकल्पाची कार्यपध्दती थोडक्यात काय आहे ?

**श्री.दादाजी भुसे (२४-१०-२०२५) :** (१) होय.

(२) दिनांक ११ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार जर्मनीतील बाडेन-वुटेनबर्ग या राज्यास महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील १०,००० कुशल मनुष्यबळ पुरविण्याबाबतच्या पथदर्शी प्रकल्पाच्या अनुषंगाने यंत्रणा, प्रशिक्षण व्यवस्था व कार्यपध्दती निश्चित करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकल्पाअंतर्गत उमेदवारांना जर्मन भाषेचे प्रशिक्षण देणे, उमेदवारांना क्षेत्रनिहाय कौशल्य वृध्दी (Up Skilling) साठी अतिरिक्त प्रशिक्षण देणे, इत्यादी बाबींचा समावेश आहे. या प्रकल्पाच्या संनियंत्राणासाठी जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय सनियंत्रण समिती तसेच तांत्रिक समिती गठीत करण्यात आली आहे.

---

## महाराष्ट्र वक्फ बोर्डाकडून सन २००८ पासून लेखापरीक्षण अहवाल सादर केला नसल्याबाबत

**(१७) ४०३१ (१८-०७-२०२५) श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **औकाफ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाने सन २००८ पासून आजपर्यंत शासनाकडे एकही लेखापरीक्षण अहवाल सादर केला नसल्याचे माहितीचा अधिकार कायदा २००५ अंतर्गत सादर केलेल्या अर्जान्वये मिळालेल्या माहितीमध्ये माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंदु विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष यांनी दिनांक २२ मार्च,२०२५ रोजी वक्फ बोर्ड बरखास्त करण्याची मागणी करत मुख्यमंत्री व अल्पसंख्याक विकासमंत्री यांना निवेदन दिले असून वक्फ बोर्डाच्या कार्यपध्दतीत पारदर्शकता राहावी, तसेच लेखापरीक्षण अहवाल सादर करणे वक्फ कायदा, १९९५ अन्वये बंधनकारक असताना, वक्फ बोर्डाने अहवाल न सादर केल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे**,**

(३) असल्यास, हिंदु विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष यांनी वक्फ बोर्ड बरखास्त करण्याच्या केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने व वार्षिक लेखापरीक्षण अहवाल नियमितपणे सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही

वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच वक्फ बोर्ड शासनाच्या आदेशांचे पालन करत नसल्यास वक्फ कायद्यातील संबंधित कलमानुसार बोर्ड बरखास्त करण्याबाबत कोणती तरतूद आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०६-११-२०२५) :** (१) होय खरे आहे.
(२) होय खरे आहे.
शासनाकडून वेळोवळी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास स्थानिक निधी लेखा परिक्षकांकडून लेखापरिक्षण करुन घेण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यास अनुसरुन वक्फ मंडळाने सन २००२-०३ पासून सन २०१७-१८ पर्यंतच्या कालावधीतील लेखापरिक्षण अहवाल वक्फ मंडळाने सादर केलेले आहेत तसेच पुढील अहवाल सादर करण्याबाबत वक्फ मंडळाकडून कार्यवाही सुरु आहे.
(३) स्थानिक निधी लेखा परिक्षकांकडून लेखापरिक्षण करुन घेण्याबाबत शासनाकडून वेळोवळी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास सूचना दिलेल्या आहेत. राज्य शासनाने उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ९७ अंतर्गत दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी न केल्यास सदर कायद्यातील कलम ९९ नुसार वक्फ मंडळ बरखास्त करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत दरडीच्या सावटाखाली वास्तव्य करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत

**(१८) ४३२२ (१८-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रोळी पार्कसाईट, साकीनाका, भांडुप, घाटकोपर या भागात डोंगरावर असलेल्या वस्त्यांमधील नागरिक गेल्या अनेक वर्षापासून दरडीच्या सावटाखाली जीव मुठीत घेऊन जीवन जगत असल्याचे दिनांक २ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साकीनाका येथील डोंगरावरील वस्तीवर दरड कोसळण्याचा सर्वाधिक धोका आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे आणि तदनुषंगाने मुंबईत दरडीच्या सावटाखाली वास्तव्य करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२९-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) भारतीय भौगोलिक सर्वेक्षण विभागाने केलेल्या सर्वेक्षणानुसार एल विभागातील साकीनाका परिसरातील ३ ठिकाणे धोकादायक गटात समाविष्ट आहेत.
(३) सदर ठिकाणांचे भौगोलिक सर्वेक्षण बृहन्मुंबई महानगरमालिकेमार्फत करण्यात आले आहे. आवश्यकतेनुसार सदर ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या नागरिकांचे तात्पुरत्या स्वरुपात महानगरपालिकेच्या

संबंधित विभागामार्फत स्थलांतरण करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) प्रमाणपत्राची मुदत वाढवून देण्याबाबत

**(१९) ८४७३ (१५-०६-२०२१) श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ६८९१ ला दिनांक ४ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षकपदी नियुक्तीसाठी एनसीईआरटीने शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण होण्याची अट घातली असून राज्यात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून दिनांक १५ डिसेंबर, २०१३ रोजी घेण्यात आलेल्या टीईटी परिक्षेत पहिल्या व दुसऱ्या पेपरसाठी बसलेल्या उमेदवारांपैकी एकूण ३१ हजार ७२ उमेदवार टीईटी परीक्षा उत्तीर्ण झाले असून उत्तीर्ण उमेदवारांना माहे मे, २०१४ मध्ये देण्यात आलेल्या उत्तीर्ण प्रमाणपत्राची वैधता (पात्रता) ७ वर्षांसाठी ग्राह्य ठेवण्यात आली असून सदरहू टीईटी उत्तीर्ण प्रमाणपत्राची वैधता माहे मे, २०२१ मध्ये संपुष्टात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक विभागाने सन २०१३ पासून राज्यात शिक्षक पदांच्या नियुक्तीवर बंदी घातली असल्याने टीईटी परीक्षा उत्तीर्ण होवूनही शिक्षक पदांसाठी नेमणुका होवू शकलेल्या नाहीत, तसेच, सेवेत कार्यरत असलेल्या व शिक्षणाधिकाऱ्यांनी मान्यता दिलेल्या परंतु, दिनांक ३१ मार्च, २०२१ अखेर टीईटी उत्तीर्ण न झालेल्या राज्यातील शिक्षकांची संख्या किती आहे व या शिक्षकांचे वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, शासनाने सन २०१२-२०१३ पासून शिक्षक पदाच्या नियुक्तीला बंदी घातल्यामुळे सन २०१४ मध्ये टीईटी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची शिक्षकपदी नेमणूकच झालेली नसल्याने त्यांच्यावर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी टीईटी प्रमाणपत्र वैधतेची मुदतवाढ दयावी अशी मागणी नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक ०५ एप्रिल, २०२१ रोजी निवेदन पाठवून केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एकदा टीईटी परीक्षा पात्र झालेल्या उमेदवारांस कायमस्वरुपी टीईटी पात्र समजण्याबाबत तसेच टीईटी प्रमाणपत्रास मुदतवाढ देण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (३०-१०-२०२५) :** (१), (२), (३), व (४) शिक्षक पात्रता प्रमाणपत्राची वैधता ७ वर्ष करण्यात आलेली होती. तदनंतर राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने दिनांक ०९/०६/२०२१ च्या पत्रान्वये शिक्षक पात्रता प्रमाणपत्राची वैधता कायमस्वरुपी ग्राह्य धरण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार आता शिक्षक पात्रता प्रमाणपत्राची वैधता ही केवळ ७ वर्ष राहीली नसून ती कायमस्वरुपी ग्राह्य धरण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षकांना प्रचलितच्या नियमानुसार अनुदान देणेबाबत

**(२०) १२३२५ (३०-०३-२०२२) श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी व्यवस्थापनाच्या विनाअनुदानित शाळांना शासनाने २० टक्के अनुदान सन २०१६ मध्ये सुरू केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांना सन २०१६ नंतर टप्पा वाढणे अपेक्षित असताना सदरहू टप्पा सन २०१७ मध्ये न वाढता सन २०१९ मध्ये २० टक्के वाढीव देण्यात आला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंशतः अनुदानित शाळेतील कर्मचाऱ्यांना प्रचलित नियमानुसार अनुदान देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१७-१०-२०२५) :** (१), (२), (३) व (४) दिनांक १४/०६/२०१६ पूर्वी अनुदानास पात्र झालेल्या, परंतु प्रत्यक्ष अनुदान सुरु न झालेल्या विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांना सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान देण्याबाबतचे आदेश दिनांक १९/०९/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

राज्य शासनाच्या मुल्यांकनाच्या सुधारीत निकषांनुसार पात्र होणाऱ्या शाळा व तुकड्यांना राज्य शासनाद्वारे वेळोवेळी दिनांक १२/०२/२०२१. दिनांक १५/०२/२०२१, दिनांक २४/०२/२०२१ व दिनांक ०६/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे वेतन अनुदानाचा टप्पा अनुज्ञेय करण्यात आला आहे. तसेच अशा शाळांना शासन निर्णय दिनांक २५/०८/२०२५ अन्वये पुढील टप्पा अनुज्ञेय आहे. शासनाच्या स्थायी आदेशांनुसार वेतन अनुदान अदा करताना राज्याची आर्थिक परिस्थिती व आर्थिक प्राथमिकता विचारात घेऊन त्यानुसार वेतन अनुदान अदा करण्यात येते.

---

**विधान भवन :** **डॉ.विलास आठवले**
**नागपूर.** **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.